Impact Factor 4.574

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Journal

VOL-V ISSUE-VI June 2018

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
- (+91) 9922455749, (+91) 8999250451

Email
- aiirjpramod@gmail.com
- aayushijournal@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

गगनबावडा जहागिरीतील शैक्षणिक परिस्थिती – एक दृष्टिक्षेप

प्रा. जनार्दन श्रीकांत जाधव,
इतिहास विभाग,
म.ह. शिंदे महाविद्यालय, तिसंगी,
ता. गगनबावडा, जि. कोल्हापूर,

प्रस्तावना :–

जहागिरकाळात आजच्यासारखी शैक्षणिक परिस्थिती नव्हती. त्यामुळे लिहिणे, वाचणे, हिशोब ठेवणे ही सर्वसामान्य शिक्षणाची पध्दत होती. तर वरिष्ठ वर्गातील लोक आपल्या मुलांना शिक्षणासाठी गुरूंच्याकडे पाठवत असत. क्षत्रिय वर्गात लिहिणे, वाचणे, बरोबरच घोडयावर बसणे, तलवार चालवणे, भाला फेकणे इत्यादी युध्दविषयक ज्ञान संपादन करण्यावर अधिक भर होता. स्त्रि शिक्षणाची कोणतीही खास व्यवस्था नव्हती.त्यामुळे फार कमी लोकांना लिहता वाचता आणि सही करता येत होती. मोडी वाचणे आणि हिशोब ठेवणे एवढाच शिक्षणाचा अर्थ होता.[१]

इ.स. १८४८ पर्यंत कोल्हापूर राज्य आणि त्याअंतर्गत असणाऱ्या जहागिर प्रदेशात शिक्षणांसंदर्भात खास सुविधा झालेल्या नव्हत्या. त्यामुळे जे काही शिक्षण दिले जात होते ते मर्यादित स्वरूपात होते. या शिक्षणाचा फायदा सर्वसामान्यांना होत नव्हता. म्हणजे शिक्षणाचे स्वरूप सर्वसमावेशक आणि सार्वजनिक नव्हते. शिवाय शिक्षणाचा मुख्य उद्देश हा लष्करी, व्यावहारिक व धार्मिक शिक्षण असाच होता.

तात्कालीन परिस्थितीतील शैक्षणिक परिस्थिती संदर्भात ग्रॅहम यांचा इ.स. १८५४ सालच्या अहवालावरून शिक्षणाची स्थिती समजते. इ.स. १८५३ नंतर शिक्षणाच्याबाबतीत झापाटयाने बदल होते गेलेले दिसतात. १८५३ मध्ये कोल्हापूर मधील इंग्रजी शाळेबरोबरच इतर आठ प्रांतात शाळा सुरू झाल्या होत्या. त्यामध्ये पन्हाळा, शिरोळ, गडहिंग्लज, भुदरगड, आळते, मलकापूर आणि गगनबावडा यांचा खास समावेश होता.[२]

'गगनबावडा' जहागिर ही शैक्षणिक दृष्टया अर्धशतक मागास होती. कित्येक सालापासून येथील लोक शिक्षणापासून वंचित होते. जहागिरीत खऱ्या अर्थाने शैक्षणिक प्रगतीस सुरूवात ही जहागिरदार श्रीमंत परशुरामराव पंत अमात्य यांच्या काळातच झाली असल्याचे दिसून येते.

श्रीमंत जहागिरदार यांच्या प्रयत्नातून बावडा जहागिरीत जवळ–जवळ २३ प्राथमिक शाळा सुरू झाल्या होत्या. जहागिरीत या काळात इयत्ता चौथीपर्यंत शिक्षणाची सोय होती. मात्र माध्यमिक शिक्षण, स्त्री शिक्षणासंदर्भात कोणतीही स्वतंत्र व्यवस्था दिसत नाही.

याशिवाय, बावडा जहागिरीत शिष्यवृत्ती,वस्तीगृहांची तसेच एकमेव ग्रंथालयाची व्यवस्था जहागिरदारांच्या प्रयत्नातून झालेली होती. शिक्षणावर होणाऱ्या खर्चाच्या तरतुदीसाठी लोकल फंड निर्माण करण्यात आला होता. पण ही रक्कम अपुरी व मर्यादित होती.त्यामुळे एकंदरीत जहागिर प्रदेशातील शैक्षणिक परिस्थिती मागास असल्याचे चित्र निदर्शनास येते.

थोडक्यात, सदर संशोधनपर निबंधात, गगनबावडा जहागिरीतील शैक्षणिक परिस्थितीवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न संशोधकाने केलेला आहे.

बावडा जहागिरदारांचे प्रयत्न :—

गगनबावडा जहागिरीचे अनेक कर्तबगार जहागिरदार होऊन गेले पण त्यांचा सुरवातीचा काळ राजकीय घडामोडी, सामाजिक आणि आर्थिक अडचणी सोडवण्यसामध्येच गेला. त्यामुळे जहागिरीत काही सामाजिक सुधारणा वगळता, इतर सुविधा झालेल्या नव्हत्या. मात्र, जहागिरदार श्रीमंत परशुरामराव पंत अमात्य यांच्या काळात (१९३१—१९४२) सामाजिक सुधारणाबरोबरच शैक्षणिक सुधारणांच्याकडे सुध्दा लक्ष दिल्याचे दिसून येते.

जहागिरीत शिक्षणाची व्यवस्था चांगली नव्हती. लोकांची आर्थिक स्थिती ही हलाखीची होती. या सर्वांसाठी जशी इतर अनेक कारणे कारणीभूत होती त्याचप्रमाणे लोकांचे अज्ञान ही तितकेच जबाबदार होते. याची जाणीव जहागिर श्रीमंत परशुरामराव पंत अमात्यांना झाली होती. म्हणून जहागिरीत मुलभूत शिक्षणाची व्यवस्था असणे गरजेचे आणि अपरिहार्य वाटल्याने त्यांनी शैक्षणिक सुधारणेकडे लक्ष दिल्याचे दिसते.

गगनबावडा जहागिरीत बावडा या ठिकाणी असणारे एकमेव ए. व्ही. स्कूल ही बंद पडण्याच्या मार्गावर असताना जहागिरदारांनी खास प्रयत्न करून हे स्कूल बंद पडण्यापासून वाचवले इतकेच नाही तर या शाळेत अद्यावत आणि प्रशिक्षित शिक्षक नेमण्यासंदर्भात त्यांची भूमिका महत्त्वाची ठरली होती. ज्यामुळे जहागिरीतील मुलांची शिक्षणाची सोय झालेली दिसून येते.[३]

शिक्षणाविषयी कोल्हापूर दरबारास पाठवविलेल्या पत्रात ते म्हणतात की, It is necessary to make and Education prapogonda and to persuade the people from the 70 villages of the Jahagir to send their Children to the school.[४]

यावरून स्वत: जहागिरदार हे शिक्षणासंदर्भात किती आग्रही होते हे लक्षात येते. त्यांच्याच प्रयत्नातून जहागिर प्रवेशात किमान प्राथमिक शिक्षणाची सुविधा उपलब्ध झाली होती असे आपणास म्हणता येईल.

प्राथमिक शिक्षणाची व्यवस्था :—

बावडा जहागिरीत प्राथमिक शिक्षणाची सोय ही इयत्ता चौथीपर्यंत होती. जहागिरीतील लोकांना किमान मुलभूत शिक्षण मिळावे यासाठी जहागिरदार श्रीमंत परशुरामराव पंत यांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्यावर भर दिला होता. त्याचाच परिणाम म्हणून इ.स. १९३८ पर्यंत जहागिरीत वीस प्राथमिक शाळा सुरू झाल्या होत्या.त्यामध्ये श्री. माधव ए. व्ही. स्कूल गगनबावडा, राशिवडे शाळा, कोकीसरे शाळा, नाधवडे शाळा, आचिणे शाळा तिथवली शाळा, पोमुर्ले शाळा, उंबर्डे शाळा, सांगुळवाडी शाळा, भुईबावडा शाळा, कुसुर शाळा, नेर्ले शाळा, भेडगाव शाळा, साखरी शाळा, अरूळ शाळा, कुर्ली शाळा, करूळ शाळा, लोर शाळा, हेत शाळा इत्यादींचा समावेश होता. तर इ.स. १९३८ मध्ये मांगवली, नानीवडे व नावली अशा आणखीन तीन शाळा सुरू करण्यात आल्या होत्या.अशा पध्दतीने जवळ जवळ २३ शाळांच्या माध्यमातून १५००/— इतके विद्यार्थी शिक्षण घेत होते.[५]

जहागिरीचा विस्तार आणि गावांची संस्था लक्षात घेतली तर ही व्यवस्था अपुरी होती. मात्र तात्कालीन परिस्थिती पहाता अशाच पध्दतीची सुविधा निर्माण करून देण्यात जहागिरदारांचे योगदान महत्त्वपूर्ण होते.

माध्यमिक शिक्षण :—

बावडा जहागिरीत माध्यमिक शिक्षणाची व्यवस्था नव्हती. जहागिरीत माध्यमिक शिक्षणाची सुविधा उपलब्ध व्हावी यासाठी श्री. राजाराम रंगोपंथ चिटपूरकर यांनी खास प्रयत्न केल्याचे तात्कालीन कागदपत्रातून दिसून येतात.[६]

परशुराम विद्यापीठ :—

बावडा जहागिरीत श्री. राजाराम रंगोपंथ चिटपूरकर यांनी परशुराम विद्यापीठ नावाची शाळा सुरू करण्याचा प्रयत्न केला होता. त्यासाठी त्यांनी जहागिरदार यांच्याकडे अनुदानासाठी अर्ज केला होता. तसेच अधिकच्या दोन शिक्षकांची व्यवस्था करावी अशी विनंती केली होती. पण तात्कालीन परिस्थितीत शाळा सुरू झाली नाही मात्र माध्यमिक शिक्षणाची किती आवश्यकता होती हे यावरून लक्षात येते. पुढे स्वातंत्र्यानंतर परशुराम माध्यमिक विद्यालय या नावाने शाळा सुरू झाल्याचे दिसून येते.[७]

तालुका शाळा :—

बावडा जहागिरीच्या मुख्य ठिकाणी जी शाळा होती. ती तालुका शाळा म्हणून ओळखली जात होती. त्या ठिकाणी इयत्ता चौथीपर्यंतच्या शिक्षणाची व्यवस्था होती. या शाळेसाठी खास पुण्याहून प्रशिक्षित मुख्याध्यापक नेमण्यात आला होता.तो मुख्याध्यापकाबरोबरच उपसहाय्यक म्हणून ही काम पाहात असे. त्यास महिना रू. ३०/— इतका पगार तसेच भत्ता म्हणून रू. ५/— आणि पदोन्नतीपोटी रू. ५/— अशी रक्कम अदा करण्यात येत होती.

तालुका शाळेच्या त्या मुख्याध्यापकास तालुक्यातील इतर प्राथमिक शाळांची तपासणी करणे तसेच गरीब आणि होतकरू विद्यार्थ्यांची निवड करून त्यांना शिष्यवृत्ती मंजूर करण्यासाठी शिफारस करावी लागत होती. त्याचबरोबर नवीन शिक्षक भरती करत असताना त्यांचा अनुभव, पात्रता आणि राहण्याचे ठिकाण पाहून नियुक्ती करण्यासंदर्भातील जबाबदारीसुध्दा पार पाडावी लागत होती. या शाळेसाठी खास रू. २०००/— ची वार्षिक तरतुद करण्यात आलेली होती.[८]

स्त्री शिक्षणाची व्यवस्था :—

जहागिरीतील स्त्रियांची सामाजिक, आर्थिक, तसेच शैक्षणिक परिस्थिती ही अत्यंत हलाखीची होती. स्त्रिया विशेषत: धार्मिक होत्या. शिक्षणाचा त्यांच्याशी कसलाही संबंध नव्हता. त्यांच्या शिक्षणासाठी जहागिरीत स्वतंत्र शिक्षणाची व्यवस्था पाहण्यास मिळत नाही. जहागिरीतील मुलींना Infant Class पर्यंतच्या वर्गात पाठवले जात असल्याचे दिसून येते. स्त्रि शिक्षणासंदर्भात कोणतीही खास उपाययोजना करण्यात आलेली नव्हती.[९]

शिष्यवृत्तीची सुविधा :—

जहागिरीतील मागास, गरीब आणि होतकरू विद्यार्थ्यांच्यासाठी खास शिष्यवृत्तीची व्यवस्था करून देण्यात आली होती. जहागिरीतून एकूण ८० विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीसाठी निवड करण्यात येत होती. त्यापैकी पहिल्या ४० विद्यार्थिनांना महिना दीड रूपये तर बाकीच्या ४० विद्यार्थ्यांना महिना एक रूपये

याप्रमाणे शिष्यवृत्ती देण्यात येत होती. शिष्यवृत्ती कोणास देण्यात यावी ही कारभारी यांच्या शिफारसीवर ठरत असे. [१०]

वस्तीगृहाची व्यवस्था :–

बावडा जहागिरीत गगनबावडा या मुख्या ठिकाणी वस्तीगृहाची सोय करण्यात आली होती. ज्यामुळे जहागिरीतील गरीब विद्यार्थ्यांची निवासाची व्यवस्था झाली होती. तसेच या वस्तीगृहाच्या देखरेखीसाठी एका शिक्षकाची नेमणूक करण्यात आली होती. त्याचबरोबर एका गडकरींची सुध्दा नेमणूक करण्यात आली होती. येथे रहाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अन्नछत्राच्या माध्यमातून मोफत भोजनाची व्यवस्था ही करण्यात आली होती. या वस्तीगृहात कोणास प्रवेश द्यायचा या संदर्भात तालुका मास्तर, कारभारी यांच्याकडे शिफारस करत असे. या वस्तीगृहासाठी खर्चाची बजेटमध्ये स्वतंत्र व्यवस्था करण्यात आलेली दिसून येते. [११]

ग्रंथालयाची व्यवस्था :–

शैक्षणिक सुधारणेच्या दृष्टीने ग्रंथालयाचे महत्त्व अनन्यसाधारण होते. ग्रंथालयाची गरज ओळखून बावडा जहागिरीत इ.स. १८८३–८४ मध्येच जी नवीन १४ ग्रंथालये स्थापन झाली होती. त्यामध्ये 'गगनबावडा' येथील ग्रंथालयाचाही समावेश असलयाचे दिसून येते. म्हणजेच जहागिरीत असे एकमेव ग्रंथालय असल्याची नोंद सापडते. [१२]

शिक्षक नियुक्ती :–

शिक्षकांच्या नियुक्ती संदर्भात जहागिरदार हे दक्ष होते. विशेषत: श्रीमंत परशुरामराव पंत अमात्य यांनी शिक्षक नियुक्ती करत असताना प्रशिक्षित शिक्षक नेमण्यावर अधिक भर दिला होता. शिक्षकांची नियुक्ती करत असताना रितसरपणे जाहीरात देऊन भरती करण्यात येत होती व संबंधित पदासाठी आलेल्या अर्जामधून योग्य पात्रतेच्या उमेदवाराची निवड करण्यात येत होती.[१३]

शिक्षकांचे प्रशिक्षण :–

जहागिर शाळात अध्यापनाचे काम करणारा शिक्षक हा प्रशिक्षित असला पाहिजे असे नेहमी जहागिरदार श्रीमंत परशुरामराव पंत अमात्य यांना वाटत होते. म्हणून त्यांनी आपल्या जहागिरीतून प्रत्येक वर्षी १ किंवा दोन शिक्षक कोल्हापूर येथील शिक्षक ट्रेनिंग स्कुलमध्ये पाठवत असत. तसेच त्याला फीमध्ये सवलत मिळावी यासाठी प्रयत्न करत असत. त्यांच्या प्रशिक्षणाच्या खर्चाची तरतूद स्वत: जहागिरदार करत असत असे दिसून येते.

शिक्षकांचे वेतन :–

बावडा जहागिर शिक्षकांच्या पगारापोटी होणाऱ्या खर्चासाठी बजेटमध्ये रू. १२००/– ची तरतूद करत असत. यामधून विविध घटकावरती खर्च करण्यात येत होता. जहागिरीतील शाळामधील अध्यापनाचे काम करणाऱ्या शिक्षकांना एकसारखे वेतन नव्हते. त्यामुळे मुख्याध्यापकांना रू. ३०/– महिना तर शिक्षकांना रू. १२/– महिना मिळत होते. तसेच इतर भत्ता, पगार वाढ, पदोन्नतीसाठी रू. ५/– ची

तरतुद करण्यात आली होती. तसेच प्रत्येक शाळेला स्टेशनरी खरेदीसाठी महिना रू. १/— देण्यात येत होता. त्याच रक्कमेमधून मागास विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीही दिली जात असल्याचे दिसून येते. [१५]

लोकलफंड :—

लोकफंड ही संकल्पना — १८७०—७१ मध्ये प्रथमता अस्तित्वात आली. कोल्हापूर राज्यांतर्गत असणाऱ्या विविध जहागिरी प्रांतात असे लोकलफंड स्थापन करण्यात आले होते. या पाठीमागची मुख्य भूमिका अशी होती की, यातून जमा होणारा पैसा जहागिरीतील सार्वजनिक सुख—सुविधा निर्माण करण्यावर खर्च करण्यात यावा. या दृष्टीने जहागिरीत लोकलफंडात जमा होणाऱ्या पैशातील ५०% रक्कम ही शिक्षण खात्यावर खर्च करण्यात येत होती. तात्कालीन परिस्थितीत जवळ जवळ रू. ७०००/— इतकी रक्कम खर्च होत होती. सदरची रक्कम ही अपुरी असून या पेक्षा अधिक पैसा शिक्षणावर खर्च झाला पाहिजे ही जहागिरदारांची भूमिका होती. त्यासाठी, जहागिरदारांनी विशेष प्रयत्न केले असल्याचे दिसून येते.[१६]

समारोप :—

थोडक्यात, बावडा जहागिर ही अर्धशतक मागास होती.जहागिरीतील लोक बऱ्याच वर्षापासून शिक्षणासारख्या मुलभूत सुविधेपासून वंचित होते. मात्र श्रीमंत परशुरामराव पंत अमात्यांच्या काळात खऱ्या अर्थाने शैक्षणिक प्रगतीसाठी सुरूवात झाल्याची दिसून येते. त्यांच्याच प्रयत्नाने बावडा जहागिरीत प्राथमिक शिक्षणाची व्यवस्था झाली होती. जहागिरीत प्राथिमक शिक्षणाची व्यवस्था झाली होती. जहागिरीतील शिक्षण व्यवस्था अद्यावत करण्यासाठी त्यांनी वारंवार कोल्हापूर दरबाराशी पत्रव्यवहार केला होता. तसेच या शिक्षणासाठी त्यांनी स्वतंत्र लोकल फंड निर्माण करून आर्थिक व्यवस्था केली होती. ज्यामधील ५०% रक्कम ही शिक्षणावर खर्च करण्यात येत होती. जहागिरीत एकंदरीतच गरीब आणि होतकरू विद्यार्थ्यासाठी वस्तीगृह, अन्नछत्र, शिष्यवृत्ती सारख्या सुविधा उपलब्ध करून देऊन प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते.

संदर्भ :—

१. गर्गे स. मा., करवीर रियासत, राणे प्रकाशन, पुणे, १९८०, पृ. ५७६
2- Ghraham D.C. , Statistical Report on Principlity State of Kolhapur, 1954, P., 196-197.
३. कोल्हापूर पुरालेखागार विभाग फाईल नं. १५, पृ. १५
४. कोल्हापूर पुरालेखागार विभाग फाईल नं. ०५, पृ. १२९
५. कोल्हापूर पुरालेखागार विभाग फाईल नं. ०६, पृ. १६३
६. कोल्हापूर पुरालेखागार विभाग फाईल नं. ०६, पृ. ५१
७. कोल्हापूर पुरालेखागार विभाग फाईल नं. ०६, पृ. ५१
८. कोल्हापूर पुरालेखागार विभाग फाईल नं. ०६, पृ. ३२
९. कोल्हापूर पुरालेखागार विभाग फाईल नं. ०६, पृ. ३२
१०. कोल्हापूर पुरालेखागार विभाग फाईल नं. ०६, पृ. ३१
११. कोल्हापूर पुरालेखागार विभाग फाईल नं. ०६, पृ. ५४

१२.कोल्हापूर गॅझेटीयर, मुंबई इलाख्याचे गॅझेटियर, पुस्तक २४, बा. प्र. मोडक यांनी भाषांतरीत केलेले पुस्तक, १८८६, पृ. ४२७
१३.कोल्हापूर पुरालेखागार विभाग फाईल नं. ०५, पृ. १३०
१४. Administration Rerport of the Kolhapur State, 1883 - 84, P-4-11
१५.कोल्हापूर पुरालेखागार विभाग फाईल नं. ०६, पृ. ४१
१६.कोल्हापूर पुरालेखागार विभाग फाईल नं. १७, पृ. ४४

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com